# <u>बँका आणि विमा निकायांसाठी माहितीच्या अधिकाराचा वापर</u>

या प्रकरणात आपण नागरिक माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ वापरून पुढील दोन निकायांकडील माहिती कसे मिळवू शकतात याचा विचार करू:-

1. बँका
2. विमा कंपन्या

*<u>शब्दावली</u>*

- **केंद्रीय माहिती आयोग:-** माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कलम २(ख) अन्वये व्याख्या. केंद्रीय माहिती आयोग हे केंद्र सरकारच्या अधीन सार्वजनिक प्राधिकरणांशी संबंधित तक्रारी आणि अपीलांवर कार्यवाही करण्यास सक्षम प्राधिकरण आहे.

- **माहिती:-** कलम २(च) अन्वये कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य, ज्यामध्ये अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने, ई-मेल, अभिप्राय, सूचना, प्रसिद्धीपत्रके, परिपत्रके, आदेश, रोजवह्या, संविदा, अहवाल, कागदपत्रे, नमुने, प्रतिमाने (मॉडेल), कोणत्याही इलेक्ट्रॉनिक स्वरुपातील आधारसामग्री आणि त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यांवये सार्वजनिक प्राधिकरणास मिळवता येईल अशी कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधित माहिती यांचा समावेश होतो.

- **सार्वजनिक प्राधिकरण:-** कलम २(ज) अन्वये याचा अर्थ, --
  क. संविधानाद्वारे किंवा तदन्वये;
  ख. संसदेने तयार केलेल्या कोणत्याही अन्य कायद्याद्वारे;
  ग. राज्य विधानमंडळाने तयार केलेल्या कोणत्याही अन्य कायद्याद्वारे;
  घ. समुचित शासनाने काढलेल्या अधिसूचनेद्वारे किंवा आदेशाद्वारे स्थापन करण्यात आलेले किंवा घटित करण्यात आलेले कोणतेही प्राधिकरण किंवा निकाय किंवा स्वराज्य संस्था, असा आहे आणि त्यामध्ये,
    (एक) समुचित शासनाची मालकी असलेला, त्याचे नियंत्रण असलेला किंवा त्याच्याकडून निधीद्वारे ज्याला प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे मोठ्या प्रमाणात वित्त पुरवठा केला जातो असा निकाय;
    (दोन) समुचित शासनाकडून निधीद्वारे जिला प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे मोठ्या प्रमाणात वित्त पुरवठा केला जातो, अशी आशासकीय संघटना, यांचा समावेश होतो.

- **माहितीचा अधिकार:-** माहितीचा अधिकार याचा अर्थ, कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणाकडे असलेली व या अधिनियमान्वये मिळवता येण्याजोगी माहिती मिळवण्याचा अधिकार, असा आहे आणि त्यामध्ये:-
    (एक) एखादे काम, दस्तऐवज, अभिलेख यांची पाहणी करणे;

(दोन) दस्तऐवजांच्या किंवा अभिलेखांच्या टिपण्या, उतारे किंवा प्रमाणित प्रति घेणे;
(तीन) सामग्रीचे प्रमाणित नमुने घेणे;
(चार) डिस्केट, फ्लॉपी, टेप, व्हिडीओ कॅसेट या स्वरूपातील किंवा कोणत्याही अन्य इलेक्ट्रॉनिक प्रकारातील माहिती किंवा जेव्हा अशी माहिती संगणकात किंवा अन्य कोणत्याही उपकरणात साठवलेली असेल त्याबाबतीत मुद्रित प्रती (प्रिंटआऊट) मार्फत माहिती मिळवणे; यांबाबतच्या अधिकाराचा समावेश होतो.

- **राज्य माहिती आयोग**:- माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कलम २(ख) अन्वये व्याख्या. राज्य माहिती आयोग हे राज्य सरकारच्या अधीन सार्वजनिक प्राधिकरणांशी संबंधित तक्रारी आणि अपीलांवर कार्यवाही करण्यास सक्षम प्राधिकरण आहे.

**१. पार्श्वभूमी**

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चा उद्देश सार्वजनिक प्राधिकरणांकडून मागवलेली माहिती मिळवून देणे असा आहे. माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कलम २ (च) अन्वये माहितीची व्याख्या करण्यात आलेली आहे तर कलम २(ज) अन्वये सार्वजनिक प्राधिकरण याची व्याख्या करण्यात आलेली आहे. संबंधित कलमे खाली पुनरुक्त केलेली आहेत:-

***कलम २(च)**:- 'माहिती' याचा अर्थ कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य, ज्यामध्ये अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने, ई-मेल, अभिप्राय, सूचना, प्रसिद्धीपत्रके, परिपत्रके, आदेश, रोजवह्या, संविदा, अहवाल, कागदपत्रे, नमुने, प्रतिमाने (मॉडेल), कोणत्याही इलेक्ट्रॉनिक स्वरुपातील आधारसामग्री आणि त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यांवये सार्वजनिक प्राधिकरणास मिळवता येईल अशी कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधित माहिती यांचा समावेश होतो.*

**कलम २(ज)**:- *'सार्वजनिक प्राधिकरण' याचा अर्थ, --*
*क. संविधानाद्वारे किंवा तदन्वये;*
*ख. संसदेने तयार केलेल्या कोणत्याही अन्य कायद्याद्वारे;*
*ग. राज्य विधानमंडळाने तयार केलेल्या कोणत्याही अन्य कायद्याद्वारे;*
*घ . समुचित शासनाने काढलेल्या अधिसूचनेद्वारे किंवा आदेशाद्वारे स्थापन करण्यात आलेले किंवा घटित करण्यात आलेले कोणतेही प्राधिकरण किंवा निकाय किंवा स्वराज्य संस्था, असा आहे आणि त्यामध्ये,*
*(एक) समुचित शासनाची मालकी असलेला, त्याचे नियंत्रण असलेला किंवा त्याच्याकडून निधीद्वारे ज्याला प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे मोठ्या प्रमाणात वित्त पुरवठा केला जातो असा निकाय;*
*(दोन) समुचित शासनाकडून निधीद्वारे जिला प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे मोठ्या प्रमाणात वित्त पुरवठा केला जातो, अशी अशासकीय संघटना, यांचा समावेश होतो*

**२. बँका सार्वजनिक प्राधिकरण या श्रेणीत येतात काय?**

सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचे नियंत्रण आणि अर्थपुरवठा भारत सरकारकडून होत असल्याने त्या सार्वजनिक प्राधिकरण या श्रेणीत येतात हे येथे नमूद करणे आवश्यक आहे. तथापि, निकाल देणाऱ्या संस्थांच्या वेगवेगळ्या आदेश आणि निर्णयांमुळे माहितीचा अधिकार अधिनियम खाजगी बँकिंग क्षेत्राला लागू करण्याच्या संबंधात देखील बदल घडून आलेले आहेत. या नमुन्यात यासंदर्भातच चर्चा करण्यात येत आहे.

भारतात सार्वजनिक क्षेत्रातील एकूण १२ बँका आहेत. वाचकांची सोय ध्यानात घेऊन काही सार्वजनिक क्षेत्रातील बँकांची सूची खाली दिलेली आहे:-




बँक ऑफ बरोडा
बँक ऑफ महाराष्ट्र
बँक ऑफ इंडिया
कॅनरा बँक
पंजाब नॅशनल बँक
इंडियन बँक
पंजाब नॅशनल बँक
कॅनरा बँक
युनियन बँक ऑफ इंडिया
युको बँक
सेंट्रल बँक ऑफ इंडिया

पंजाब अँड सिंध बँक

अ नुकतीच माहितीच्या अधिकाराखालील एका अर्जाद्वारे लेखापरीक्षण आणि तपासणी अहवालांबाबत भारताच्या रिझर्व्ह बँकेकडून (रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाकडून) माहिती मागण्यात आली होती. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने अशा लेखापरीक्षण अहवाल आणि धोका निर्धारण अहवालांची माहिती माहितीच्या अधिकाराखाली पुरवण्याचे निर्देश भारतातील बँकांना दिले. या निर्देशांमध्ये बँकांच्या मोठ्या थकबाकीदारांची यादी जाहीर करण्याबाबत उल्लेख होता. तथापि, बँका मागितलेली माहिती पुरवण्याबाबत धास्तावलेल्या होत्या आणि त्यांनी या निर्देशांमुळे व्यथित होऊन मा सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. न्यायालयाने ती याचिका फेटाळली आणि रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या निर्देशांची वैधता ग्राह्य धरली.

त्यानंतर, बँकांनी हा निकाल रद्द करण्यासाठी अर्ज केला. परंतु यथावकाश सर्वोच्च न्यायालयाने तो अर्ज फेटाळला.

आ रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने आपल्या अधिकृत संकेतस्थळावर अर्जदारांच्या माहितीसाठी माहिती अर्ज दाखल करण्याच्या संदर्भात तपशील दिले आहेत. त्यातील महत्वाच्या मुद्द्यांची संक्षिप्त माहिती खाली दिलेली आहे:-

पारदर्शकता अधिकाऱ्यांचे तपशील खालीलप्रमाणे देण्यात आलेले आहेत:-

श्री सुब्रत दास
मुख्य महाव्यवस्थापक आणि विभाग प्रमुख
मनुष्यबळ संसाधन व्यवस्थापन विभाग
केंद्रीय कार्यालय इमारत (सेंट्रल ऑफिस बिल्डिंग) (२१ वा मजला)
शहिद भगतसिंग मार्ग, फोर्ट
मुंबई - ४००००१
दूरध्वनी २२६११९५४

इ रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने पूर्वीपासून उपलब्ध असलेल्या माहितीची यादी पुढीलप्रमाणे दिलेली आहे.

- मुद्राविषयक धोरण आणि मुद्राविषयक धोरण अहवाल
- त्रैमासिक प्रकाशनांमधील अहवाल
- मासिक प्रकाशनांमधील अहवाल
- दैनिक प्रकाशनांमधील अहवाल
- प्रासंगिक प्रकाशनांमधील अहवाल

ई रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने ज्ञापन क्र आरबीआय/ २०२१-२२/८४ हे ज्ञापन काढून बँकांना त्यांची एटीएम मशीनची सेवा एका महिन्यात दहा तासांहून अधिक काळ बंद राहणार नाही अशी खबरदारी घेण्याचे देखील निर्देश दिले. एटीएममध्ये पुरेशी रोख रक्कम उपलब्ध असेल अशी खबरदारी घेणे हा हे ज्ञापन जारी करण्यामागील उद्देश होता.

या मार्गदर्शक सूचनांच्या संदर्भात माहितीचा अधिकार कसा उपयुक्त ठरेल हे दर्शवण्यासाठी या नमुन्याच्या शेवटी माहितीच्या अधिकाराखालील नमुना अर्ज जोडलेला आहे.

### ३. बँकांकडून माहितीच्या अधिकाराखाली कोणती माहिती मागता येते?

जिच्यात सरकार किंवा त्याच्या कार्याधारकांची भूमिका जनतेच्या कल्याणासाठीच्या निर्णय किंवा सहाय्य किंवा अन्य कोणत्याही स्वरूपात आहे, अशी कोणतीही माहिती त्या संस्थेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करून मागता येईल.

अर्जदार राज्याचा एखाद्या खाजगी संस्थेमधील सहभाग दर्शवू शकत असल्यास अशा खाजगी संस्थांकडे अर्ज सादर करता येईल.

उदाहरणार्थ:- सरकारी कंपन्यांनी परिघावरील समुदायाच्या उद्धारासाठी अशासकीय संस्थांना (एनजीओ) केलेले अर्थसहाय्य. दुसरे उदाहरण सरकारने खाजगी बँकेबरोबर आपल्या सामाजिक कल्याणाच्या पुढे चालवण्यासाठी खाजगी बँकांना निधी पुरवण्याबाबत केलेला करार हे देखील आहे.

बँकांकडे माहितीचे अर्ज सादर करून सरसकट पुढील महत्वाची माहिती मागता येईल:-

१ एखाद्या विवक्षित वर्षातील अनर्जक मत्ता (नॉन परफॉर्मिंग असेट्स - एनपीए)

२ एखाद्या विवक्षित वर्षातील अनर्जक मत्तेची रक्कम. या उपमुद्द्यांबाबतची माहिती बँकेचे आर्थिक स्थैर्य निर्धारित करण्यास उपयुक्त ठरते आणि त्यायोगे ग्राहक आपला निधी योग्य वेळेत अन्य बँकेकडे वळवू शकतात.

सन २०१३ मध्ये माहितीच्या अधिकाराखाली अर्ज करणाऱ्या एका अर्जदाराने जिच्याबाबत केंद्रीय जन माहिती अधिकाऱ्याने माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कलम ८(१)(क) आणि ८(१)(ङ) अन्वये अपवाद लागू केला होता अशा रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या क्षेत्रीय संचालकाच्या विरोधातील त्याच्या तक्रारीबाबत माहितीची मागणी केली होती. अर्जदाराने मा केंद्रीय माहिती आयोगापुढे द्वितीय अपील सादर केले तेव्हा तत्कालीन केंद्रीय माहिती आयुक्तांनी अपिलार्थीच्या बाजूने निकाल देताना नमूद केले की, केवळ माहितीचे प्रकटन कसूरदार संस्थांवरील लोकांच्या विश्वासावर विपरीत परिणाम घडवून आणेल हे नकार देण्यास पुरेसे कारण नाही. अपवाद लागू होत असले तरीदेखील माहिती देण्यासाठी व्यापक जनहिताचा विचार करणे अनिवार्य आहे असेही केंद्रीय माहिती आयोगाने नमूद केले.

### ४. विमा कंपन्या सार्वजनिक प्राधिकरण या श्रेणीत येतात काय?

होय, विमा कंपन्या सार्वजनिक प्राधिकरण या व्यापक श्रेणीत समाविष्ट होतात. परंतु सरकारी आणि खाजगी विमा कंपन्यांकडे अर्ज करण्याच्या पद्धती वेगळया आहेत. या पद्धती खाली दिल्याप्रमाणे आहेत:-

अ सरकारी विमा कंपनीकडे माहितीच्या अधिकाराखालील अर्ज सादर करताना तुम्ही तो अर्ज संबंधित शाखेच्या जन माहिती अधिकाऱ्याला संबोधित करू शकता.

भारतात सरकारी क्षेत्रातील ७ विमा कंपन्या आहेत. सरकारी क्षेत्रातील विमा कंपन्यांची यादी पुढीलप्रमाणे आहे:-

१ *भारतीय आयुर्विमा महामंडळ (लाईफ इन्श्युरन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया - एलआयसी)*
२ *भारतीय सर्वसाधारण विमा महामंडळ (जनरल इन्श्युरन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया)*
३ *न्यू इंडिया इन्श्युरन्स कंपनी लिमिटेड*
४ *युनियन इंडिया इन्श्युरन्स कंपनी लिमिटेड*
५ *दि ओरिएंटल इन्श्युरन्स कंपनी लिमिटेड*
६ *नॅशनल इन्श्युरन्स कंपनी लिमिटेड*
७ *ॲग्रीकल्चर इन्श्युरन्स कंपनी ऑफ इंडिया लिमिटेड*

आ खाजगी विमा कंपनीकडील माहिती मिळवण्यासाठी माहितीच्या अधिकाराखालील अर्ज विमा नियंत्रकांना म्हणजेच इन्श्युरन्स रेग्युलेटरी अँड डेव्हलपमेंट ऑथॉरिटी ऑफ इंडिया (आयआरडीएआय) कडे सादर करावा लागतो.

इ इन्श्युरन्स रेग्युलेटरी अँड डेव्हलपमेंट ऑथॉरिटी ऑफ इंडिया (आयआरडीएआय) कडे माहितीच्या अधिकाराखालील अर्ज ऑनलाईन किंवा ऑफलाईन पद्धतीने सादर करता येतो. ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्यासाठी इन्श्युरन्स रेग्युलेटरी अँड डेव्हलपमेंट ऑथॉरिटी ऑफ इंडिया (आयआरडीएआय) च्या या संकेतस्थळाला भेट द्यावी. माहिती अर्ज सादर करण्याबाबतची अन्य सर्व माहिती इन्श्युरन्स रेग्युलेटरी अँड डेव्हलपमेंट ऑथॉरिटी ऑफ इंडिया (आयआरडीएआय) च्या संकेतस्थळावर दिलेली आहे.

ई कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणाने एखादी बाब नीट न हाताळल्यास, अर्जदार विमा लोकपाल (इन्श्युरन्स ओम्बडसमन) यांच्याकडे अर्ज सादर करू शकतो.

### ५. माहितीच्या अधिकाराखाली विमा कंपन्यांकडून कोणती माहिती मागवता येईल?

बँकांकडे माहितीचे अर्ज सादर करून सरसकट पुढील महत्वाची माहिती मागता येईल. विम्याचे दावे सादर करून देखील कोणतीही कार्यवाही झालेली नसल्यास किंवा दाव्यांच्या प्रक्रियेत अकारण विलंब होत असल्यास हि माहिती उपयुक्त ठरू शकेल. ही माहिती पुढीलप्रमाणे:-

१ तुम्ही सादर केलेल्या दाव्याची स्थिति
२ तुमच्या दाव्यावर केलेली कार्यवाही
३ तुमचा दावा हाताळणाऱ्या व्यक्तीचे नाव आणि पद
४ दावा निकाली काढण्यातील विलंबासाठी नमूद केलेली कारणे
५ दावा फेटाळण्यासाठी समुद केलेले कारण
६ उदाहरणार्थ:- माहितीच्या अधिकाराखालील एका अर्जामुळे विमा कंपनीने कोरोंना व्हायरसमुळे झालेल्या ४५,००० मृत्युंचे एकूण ३३०० कोटी रुपयांचे डावे जून २०२१ पर्यंत मंजूर केल्याचे उघडकीस आले. फेब्रुवारी २०२१ मध्ये जितेंद्र घाडगे यांनी सादर केलेल्या माहितीच्या अधिकाराखालील एका अर्जामुळे उघडकीस आले की विमा लोकपालाच्या (इन्श्युरन्स ओम्बडसमन) २०% आदेशांचे अद्याप पालन झालेले नाही हे अन्य एक उदाहरण आहे.

### ६. विमा लोकपालाची (इन्श्युरन्स ओम्बडसमन) भूमिका: एक दक्ष पर्याय

विमा लोकपाल (इन्श्युरन्स ओम्बडसमन) हा विमा पॉलिसी किंवा दाव्यांच्या संदर्भात व्यथित लोकाच्या तक्रारी हाताळणारा अधिकारी असतो. विम्याशी संबंधित तक्रारी हाताळण्यासाठी केलेली ती एक प्राथमिक व्यवस्था आहे. वेगवेगळया शाखा/ कार्यालयांसाठी वेगवेगळे विमा लोकपाल (इन्श्युरन्स ओम्बडसमन) असतात. माहितीच्या अधिकाराखाली माहिती मिळवण्याची तरतूद असली तरीदेखील, विमा लोकपालाचे (इन्श्युरन्स ओम्बडसमन) कार्यालय त्याला समांतर कार्य करते. त्यामुळे विमाधारकांना दुहेरी लाभ मिळतो.

आयआरडीए ने दिलेल्या माहितीनुसार विमा लोकपाल पुढील स्वरुपाच्या तक्रारी हाताळतात:-

विमाधारक (यात विमाधारकांचे प्रतींनिधी आणि मध्यस्थ यांचाही समावेश होतो) किंवा विमा विक्रेता यांच्या पुढीलपैकी कोणत्याही आधाराने केलेली कोणतीही तक्रार:-

१ भारतीय विमा नियामक आणि विकास प्राधिकरण अधिनियम, १९९९ (इन्श्युरन्स रेग्युलेटरी अँड डेव्हलपमेंट ॲक्ट, 1999 - आयआरडीएएल ॲक्ट, 1999) द्वारे विनिर्दिष्ट कालावधीहून जास्त काळासाठी दाव्यांच्या अदायगी मध्ये झालेला विलंब;
२ विमाकाराने केलेला कोणत्याही दाव्याचा अंशतः किंवा पूर्णतः प्रत्यादेश;
३ विमा पॉलिसीसाठी अदा केलेल्या किंवा देय हफ्त्यांबाबतचे वाद;
४ पॉलिसीच्या दस्तऐवज किंवा करारातील पॉलिसीच्या अटी व शर्तींचे कोणत्याही वेळी झालेले दुर्व्यपदेशन;
५ दाव्यांबाबतच्या वादांच्या संदर्भात लावलेला विमा पॉलिसीचा विधीक अन्वयार्थ;
६ पॉलिसीच्या सेवेच्या संदर्भात विमाकार, त्यांचे एजंट आणि मध्यस्थ यांच्या विरोधातील तक्रारी;
७ आयुर्विमा पॉलिसी, आरोग्य विम्यासह सर्वसाधारण विमा पॉलिसी जारी करताना त्या प्रस्तावकाने सादर केलेल्या प्रस्तावाशी अनुरूप नसणे;
८ आयुर्विमा आणि आरोग्य विम्यासह सर्वसाधारण विमा पॉलिसीचा हफ्ता भरल्यावर त्या जारी न करणे; आणि
९ विमाधारकांच्या हिताचे किंवा अन्य कोणत्याही प्रकारे संरक्षण करण्यासाठीच्या प्राधिकरणाच्या कोणत्याही नियमाच्या तरतुदींचे किंवा प्राधिकरणाने जारी केलेल्या कोणत्याही ज्ञापन, परिपत्रक, सूचना किंवा निर्देशांचे किंवा पॉलिसीच्या करारातील अटी व शर्तीचे पालन न केल्यामुळे उद्भवणारे कलम १ ते ९ दरम्यान नमूद केलेल्या बाबींच्या संदर्भातील वाद.

विमा लोकपाल (इन्श्युरन्स ओम्बडसमन) मध्यस्थाची भूमिका बजावतो. तो प्रकारण्यांच्या तथ्यांवर आधारित सूचना करतो आणि त्या तक्रारदाराने स्वीकारल्यानंतर तो कंपनीला तसे कळवतो. या सूचनांचे पालन १५ दिवसात करणे बंधनकारक असते.

वरील मार्गाने यश न मिळाल्यास, लोकपाल तीन महिन्यात निवाडा देऊ शकतो आणि त्याचे पालन ३० दिवसात करणे अनिवार्य आहे.

**७. माहितीचा अधिकार आणि लोकपाल यातील फरक**

माहितीचा अधिकार आणि लोकपाल यातील मुख्य फरक हा आहे की जेव्हा लोकपालाने एखादी तक्रार हाताळल्यावर त्यावर कालबद्ध किंवा समयसीमेत कार्यवाही होणे अनिवार्य असते. तथापि, माहितीच्या अधिकाराखालील द्वितीय अपीलाची हाताळणी होते तेव्हा कालावधीबाबत संदिग्धता राहत नाही.

माहितीच्या अधिकाराची प्रकरणे  आणि प्रथम अपिलासाठी अनुक्रमे ३० ते ४५ दिवसांच्या कालमर्यादा आहेत, तर लोकपाल विम्याशी संबंधित प्रकरणे हाताळतो तेव्हा तुम्ही निश्चित काळात उत्तराची अपेक्षा बाळगू शकता. दुसऱ्या बाजूला, जन माहिती अधिकारी किंवा माहिती आयुक्त वेगवेगळया विषयांशी संबंधित अनेक माहितीचे अर्ज हाताळत असल्याने माहितीच्या अधिकाराखालील अर्ज हाताळण्यास बराच विलंब होतो.

*<u>माहितीच्या अधिकाराखालील नमुना अर्ज</u>*

नोव्हेंबर ११, २०२१

प्रति,

जन माहिती अधिकारी
स्टेट बँक ऑफ इंडिया
रोहिणी शाखा
नवी दिल्ली, भारत

मा महोदय/ महोदया

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) अन्वये पुढील माहिती मागवण्यात येत आहे. कृपया पुढील माहिती पुरवावी:-

१. यक्षज्ञ इमारत, रोहिणी, नवी दिल्ली येथील एटीएम सन २०२१ च्या ऑक्टोबर महिन्यात किती कालावधीसाठी कार्य करत होते तो कालावधी तासात.
२. यक्षज्ञ इमारत, रोहिणी, नवी दिल्ली येथील एटीएम सन २०२१ च्या ऑक्टोबर महिन्यात किती कालावधीसाठी कार्य करत नव्हते तो कालावधी तासात.
३. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने निर्धारित केलेल्या कालावधीहून जास्त काळासाठी कार्य करत नसल्यास, बँकेने भरलेल्या दंडाची रक्कम.

आपला,
यक्षज्ञ

**अर्ज निकाली काढण्यापूर्वी कृपया या बाबी विचारात घ्याव्यात:-**

१. आवश्यक असल्यास, कृपया माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ५(३) अन्वये माहिती मिळवण्यास *‘रास्त सहकार्य करावे’*.

२. माहिती पूर्णतः किंवा अंशतः कोणत्याही अन्य विशिष्ठ खात्याकडे उपलब्ध असल्यास, कृपया कलम ६(३) अन्वये अर्ज, अंशतः किंवा पूर्णतः, संबंधित खात्याकडे अंतरित करावा.